**MHKO120001662014**

# निशाण क्रमांक ३७ खालील आदेश.

( मौल बागवान वि. अल्लाबक्ष बागवान वगैरे )

अर्जदार यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १३ व कलम १५१ प्रमाणे कोर्ट कमिशन नेमणूकीसाठी केला आहे.

०२. अर्जदार यांनी प्रस्तुतचे प्रकरण विरोधी पक्ष (वि.प. संक्षीप्त करिता) यांच्या विरुध्द दिवाणी दावा क्र.९१/१९९३ व त्यावरील मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील अपील क्र. २९६/२००१ मधील वाटपाबाबत झालेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दाखल केलेली आहे. प्रस्तुत कामी दावा मिळकत, ग्रामपंचायत मिळकत क्र.१११७ (सध्याचा घर मिळकत क्र.११६५/१ ते ३) या घर मिळकतीमध्ये अर्जदार व वि. प. यांचा मा. जिल्हा न्यायालयातील अपिलामधील हुकूमनाम्याप्रमाणे होणारा हिस्सा कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून त्यांच्या मार्फत, त्यांना मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर वि.प. म्हणणे मागवले असता, त्यांनी सदर अर्जाबाबत त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे म्हणणे दिले आहे.

०४. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्जदारतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दिवाणी दावा क्र.९१/१९९३ मधील हुकमनाम्यावर मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे अपील क्र. २९६/२००१ दाखल करण्यात आले होते. मा. जिल्हा न्यायालयाने सदर अपीलामध्ये अर्जदार व वि.प. यांचे दावा मिळकतींमध्ये कायद्याने होणारे हिस्से ठरवले आहेत. त्यामुळे, अर्जदार यांना दावा मिळकत, ग्रामपंचायत मिळकत

क्र.१११७ (सध्याचा घर मिळकत क्र.११६५/१ ते ३) या मिळकतीमधील त्यांचा हिस्सा ठरवून मिळणेसाठी कोर्ट कमीशनर यांची नेमणूक होणे आवश्यक आहे. याउलट, वि.प. तर्फे विधिज्ञांनी सदर युक्तवादावर त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगीतले आहे. तरी, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन मी खालील आदेश परित करीत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. सदर कामी विधिज्ञ श्री. बी. पी जगदाळे, यांची कोर्ट कमीशन म्हणून नेमणूक करणेत येत आहे.

३. कोर्ट कमीशन यांनी अर्जात नमुद दावा मिळकतीची, मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर, अपील क्र. २९६/२००१ मधील हुकूमनाम्याप्रमाणे, मोजणी करुन स्वतंत्र नकाशा तयार करुन त्याचा अहवाल नकाशासह पुढील नेमल्या तारखेपर्यंत सादर करावा.

४. अर्जदार यांनी कोर्ट कमीशनर यांना आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे आदेशापासून आठ दिवसांच्या आत न चुकता द्यावीत.

५. दोन्ही पक्षकारांनी कोर्ट कमीशनर यांना मोजमापाच्या कामामध्ये सहकार्य करावे.

६. अर्जदार यांनी कोर्ट कमीशन बाबतचा होणारा खर्च, म्हणून रक्कम रु.५,०००/- न्यायालयात जमा करणेचे आहे.

७. आदेशाप्रमाणे कमिशन रिट जारी करणेत यावे.

**स्वाक्षरी/-**

स्थळ : गारगोटी. **( व्ही. बी. मुल्ला )**

दिनांक : १५/०१/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी

I affirm that the contents of this P.D.F. file Order / Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mr. Rahul S. Chavan. |
| Name of Court | : | Court of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Gargoti, Tah. - Bhudargad, District - Kolhapur |
| Date of Dictation | : | 15/01/2022. |
| Order signed by the P.O. on | : | 15/01/2022. |
| Order uploaded on | : | 15/01/2022. |